# जिल्हा व अतिरीक्त सत्र न्यायालय, पनवेल-रायगड

## जाहिर नोटीस

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे दिनांक २६.०८.२०२२ चे पत्र व मा. जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग यांचे दिनांक २६. ०२.२०२६ व दिनांक ०९.०४.२०२६ चे पत्रान्वये जाहिर नोटीस देणेत येते की, जिल्हा न्यायालय, पनवेल यांचे कार्यालयातील कागदपत्रांच्या झेरॉक्स काढण्यासाठी विहीत नमुन्यातील निविदा/दरपत्रक मा. जिल्हा व सत्र न्यायाधीशह-१, पनेवल-रायगड यांचे नावाने दिनांक १५.०५.२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अधिक्षक, जिल्हा न्यायालय, पनवेल यांचेकडे सादर करावीत, अथवा समक्ष आणून दयावीत. त्यानंतर प्राप्त निविदांचा/दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

सदर निविदा/दारपत्रक, यांचे पाकीटावर वरच्या भागात **प्रति, मा. जिल्हा न्यायाधीश-१, पनवेल-रायगड,** असे नमुद करावे तसेच " **कागदपत्रांच्या झेरॉक्स काढण्यासाठी निवीदा**" असे नमुद करून अधिक्षक, जिल्हा न्यायालय, पनवेल, यांचेकडे सादर करावीत.

तसेच सेवा पुरविण्यास इच्छुक असणारे व्यक्ती अथवा असणा-या नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार संस्था/सेवा सोसायटी अथवा या संबंधित इतर नोंदणीकृत संस्था व त्यांचे पदाधिकारी यांचेविरूध्द कोणत्याही ठिकाणी कोणत्याही प्रकारची फौजदारी स्वरूपाची तक्रार पोलीस ठाण्यात नसावी किंवा कोणत्याही न्यायालयात फौजदारी प्रकरण न्यायप्रविष्ट नसावे. तसेच अशा प्रकारे सेवा इतर शासकीय कार्यालयात पुरविल्याबाबत अनुभव असल्यास

त्याबाबतची कागदपत्र दाखल करावीत. प्राप्त झालेल्या मोहरबंद निविदा स्विकारण्याचे किंवा नाकारण्याचे सर्व अधिकार कोणतेही कारण न सांगता, मा. जिल्हा न्यायाधीश-१, पनवेल-रायगड यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहेत. या प्रकिये मार्फत निवड झालेल्याचा प्रस्ताव अंतिम मंजूरीसाठी मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश रायगड-अलिबाग, यांनी दिलेल्या मंजूरी नंतरच पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

तसेच ज्यांनी निविदा मंजूर होईल त्यांनी सेवा उपलब्ध करून देतांना मा. उच्च न्यायालय, मुंबई, मा. जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग, यांचे कडील आदेश तसेच महाराष्ट्र शासनाच्या त्यासंदर्भात वेळोवेळी पारीत करण्यात आलेल्या शासन निर्णय/परिपत्रकांचे अधिन राहून व त्या अनुषंगाने आवश्यक असणारे लिखित करार करून दयावयाच्या सर्व अटी व शर्तीचे पालन करणे आवश्यक आहे.

दिनांक-२७/०४/२०२६

27/04/2026

जिल्हा न्यायाधीश-१,
पनवेल-रायगड

प्रत- मा. जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग यांचे अधिकृत
संकेतस्थळावर जाहिर करण्याकरिता सादर.